MHSO110007252026

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४९/२०२६**
**सतिश सावंत वि. राज्य उत्पादन शुल्क**

**<u>निशाणी क्र. ०१ खालील आदेश</u>**

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे आहे की, अर्जदाराच्या मालकीची बजाज कंपनीची प्लॅटीनो, नोंदणी क्र. एम.एच.४२–एल.३१२१, हे वाहन राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस विभाग, सोलापूर पोलीस स्टेशन यांनी गु.र. क्र. ५८/२०२६, महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (अ) व (ई) या गुन्हयामध्ये जप्त केली आहे. वर नमुद वाहन मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदर कामी सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि तपासिक अंमलदार यांचे म्हणणे मागविण्यात आले.

४. तपासिक अंमलदार व सहा. सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे दाखल करुन सदर वाहन अर्जदारास परत करणेबाबत हरकत घेतली आहे.

५. अर्जदाराने अर्जासोबत आधारकार्ड, प्रथम खबर अहवाल, वाहन नोंदणी प्रमाणित प्रत, असे कागदपत्र दाखल केलेले आहेत. सदर कागदपत्रांवरुन सदरचे वाहन अर्जदार यांच्या मालकीचे असल्याचे दिसून येते. वाहन नोंदणी प्रमाणित प्रत प्रतीवरील नोंदीप्रमाणे गाडीचा चेसिस क्रमांक व इंजिन क्रमांक जुळतो आहे.

६. अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जदाराने वर नमुद वाहनाचा त्यांना दैनंदिन वापरासाठी उपयोग होत असल्याचे सांगितले आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी वाहन

परत करणेबाबत हरकत घेतली असली तरी, अर्जदार हे सदर वाहनाचे प्रथमदर्शनी नोंदणीकृत मालक असल्याने ते जप्त वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यास हक्कदार आहेत. त्यांना त्याचा ताबा न दिल्यास व ते तसेच पोलीस ठाणे येथे पडून राहिल्यास त्याचे नुकसान होणार आहे. सबब, सदरचे वाहन अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात शर्ती व अटींवर देणे योग्य होणार आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस विभाग, जि. सोलापूर यांनी ५८/२०२६, नोंदणी क्र. एम.एच.४२–एल.३१२१, चेसीस नं. ०२७५५, इंजिन नं. १८०७२, अर्जदार सतिश सोनबा सावंत, रा. सिध्दार्थनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांना त्यांनी रक्कम रुपये १,००,०००/– चा सुपूर्तनामा पोलीस स्टेशन येथे सादर केल्यानंतर व त्यात खालील अटी नमूद केल्यानंतर अर्जदाराचे ताब्यात देण्यात यावे. |
| अ. | अर्जदार यांनी मूळ प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत वाहनाच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल करणेचा नाही. |
| ब. | अर्जदार यांनी मूळ प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत प्रस्तुत वाहनामध्ये त्रयस्थ इसमाचा हितसंबंध कोणत्याही प्रकारे निर्माण करणेचा नाही. |
| क. | अर्जदार यांनी न्यायालय आदेश करेल त्यावेळेस प्रस्तुतचे वाहन न्यायालयासमोर हजर करावे. |
| ३. | निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस विभाग, जि. सोलापूर यांना असेही आदेशित करण्यात येते की, त्यांनी प्रस्तुतचे वाहन अर्जदारास परत करण्यापूर्वी त्याचा इंजिन क्रमांक व चेसीस क्रमांक नमूद करून प्रस्तुत वाहनाचा यथोचित पंचनामा करावा. तसेच त्यांनी वाहनाचे प्रत्येक बाजूने छायाचित्रे घ्यावीत. सदर पंचनामा व छायाचित्रे त्यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात येत असल्यास त्यासोबत जोडावी. |
| ४. | निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस विभाग, जि. सोलापूर यांना असेही आदेशित करण्यात येते की, अर्जदाराने वाहन इन्शुरन्सबाबतचे कागदपत्रे सादर केल्यानंतर सदरचे वाहन अर्जदार यांना परत करण्यात यावे. |

| | |
|---|---|
| ५. | प्रस्तुतचे प्रकरण दोषारोपत्र पत्र दाखल झालेस त्यासोबत ठेवण्यात यावे. |

(न्यायासनावर निवेदीत आणि अधिघोषीत.)

Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.03.18 13:56:46 +0530

(गुलफराज एम. बिरादार)

दिनांकः– १८.०३.२०२६

३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

माळशिरस